# कालचक्र

| | | |
|---|---|---|
| कालची उल्का | — | आजची गारगोटी |
| कालची वीज | — | आजचा अंधार |
| कालचा वणवा | — | आजची राख |
| कालचा झंझावात | — | आजची मोडकळ |
| कालचा महापूर | — | आजचा दुष्काळ |
| कालचें अरण्य | — | आजचें वाळवंट |
| कालचें शहर | — | आजची स्मशानभूमि |
| कालचा जोहार | — | आजचा कोळसा |
| कालचा देशभक्त | — | आजचा निर्वासित |
| कालची यौवना | — | आजची वृद्धा |
| कालचा टवटवीत फुलोरा | -- | आजचें निर्माल्य |
| कालची पौर्णिमा | — | आजची अमावास्या |
| कालची भरदुपार | — | आजची काळरात्र |
| आजची काळरात्र | — | |
| | — | उद्यांचा उषःकाल दाखवेल कां? |

प्रतिभा बोपर्डीकर